औद्योगिक न्यायालय, सोलापूर व कामगार न्यायालय, सोलापूर या कार्यालयांकरीता नवीन जागा भाडे तत्वावर घेण्यास मान्यता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांकः औन्यामुं-०७२६/प्र.क्र.८०/काम-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २८ जुलै, २०२६

वाचा :

१) वित्त विभाग शासन निर्णय क्र.: विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय-भाग-२, दि.१७.०४.२०१५
२) औद्योगिक न्यायालयाचे पत्र क्र.औन्यामुं/आस्था-२/१६३१, दि.१६.०६.२०२६
३) विभागाचा शासन निर्णय क्र.: औन्यामुं-०५१७/प्र.क्र.६६/कामगार-६, दि.१७.१०.२०१७

प्रस्तावना :

शासनाच्या संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आल्यानुसार औद्योगिक न्यायालय, सोलापूर व कामगार न्यायालय, सोलापूर ही कार्यालये गणेश चेंबर्स, रेल्वे लाईन, रंगभवन , सोलापूर या इमारतीमध्ये भाडेतत्वावर कार्यरत होती. तथापि, श्री. विलास के. पाटील, जागामालक यांनी सदर जागा खाली करण्याबाबत नोटीस दिलेली आहे. त्यास अनुसरून औद्योगिक न्यायालय, सोलापूर व कामगार न्यायालय, सोलापूर या कार्यालयांकरीता श्री. नागप्पा संगमेश्वर काडादी यांच्या मालकीच्या तिसरा, चौथा व पाचवा मजला, काडादी टॉवर्स, सोलापूर या इमारतीमध्ये जागा भाडेतत्वावर घेण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

औद्योगिक न्यायालय, सोलापूर आणि कामगार न्यायालय, सोलापूर या कार्यालयांकरीता तिसरा, चौथा व पाचवा मजला, काडादी टॉवर्स, सोलापूर या ठिकाणी रु.२,४९,७३९/- (अक्षरी रुपये दोन लाख एकोणपन्नास हजार सातशे एकोणचाळीस फक्त) (महानगर पालिका कर व इतर कर वगळून) प्रतिमाह या दराने जागा भाड्याने घेण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरचा भाडेकरारनामा सदस्य, औद्योगिक न्यायालय, सोलापूर आणि न्यायाधीश, कामगार न्यायालय, सोलापूर यांच्या स्तरावर करावा.

३. सदर भाडेकरारनामा करताना संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये प्रस्तावित केल्यानुसार सोलापूर येथे आगामी काळात स्थापन होणाऱ्या न्यायाधीकरणांची विभागीय खंडपीठ आणि एकल खंडपीठ याकरीता मुलभूत व पायाभूत सुविधा व आवश्यक संरचानात्मक बदल नवीन जागा मालक करुन देणार असल्याबाबत खात्री करावी.

तसेच सद्यस्थितीत न्यायालयांकरीता आवश्यक असलेल्या सोयीसुविधा, पायाभूत सुविधा सदर इमारतीमध्ये असल्याबाबत खात्री करावी.

४. सदर कार्यालयांकरीता संबंधित खाजगी इमारत भाडेकरारनामा करण्यात आल्याच्या दिनांकापासून पुढील ०३ वर्षाच्या कालावधीकरीता अथवा न्यायालयांकरीता नवीन बांधण्यात येणार असलेली शासकीय इमारत उपलब्ध होईपर्यंत किंवा पुढील आदेश निर्गमित होतील तोपर्यंत (जे प्रथम होईल ते) भाडेतत्वावर उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. सदरचा खर्च मागणी क्र. के-४, मुख्यलेखाशिर्ष २२३०, कामगार व सेवायोजन (०१) कामगार (१०१) औद्योगिक संबंध (००-०१) औद्योगिक लवाद न्यायालये २२३००४८८, १४-भाडेदर आणि कर यांतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा.

६. वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग एक मधील अनु.क्र.१० नियम क्र.११५ आणि महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ मधील नियम क्र.१४७ (क) अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारांस अनुसरून सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२८१२१०१०२०५४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANJUSHA VIVEK JADHAV

Digitally signed by MANJUSHA VIVEK JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=19C32983E1706CC3122B8F4304D7AD97504378DD37C1905BE087976C681D5693, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C863197461AB2B6B902905D37E84BFB69111A694D0830AEBAACA5AB371BC261C, cn=MANJUSHA VIVEK JADHAV
Date: 2026.07.28 12:12:34 +05'30'

(मं.वि.जाधव)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री यांचे स्वीय सहायक, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अध्यक्ष, औद्योगिक न्यायालय, महाराष्ट्र, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
५. सदस्य, औद्योगिक न्यायालय, सोलापूर.
६. न्यायाधीश, कामगार न्यायालय, सोलापूर.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, सोलापूर.
१०.निवडनस्ती/ काम-६